# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सोलापूर जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीबाबत**

**(१) ९५९७ (०७-०४-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ३१२ गावामध्ये दिनांक २६ जानेवारी, २०१५ पासून जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावाची निवड कोणत्या निकषानुसार करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त अभियान पूर्ण करण्यासाठी शासनाच्या निरनिराळ्या विभागामार्फत किती निधी खर्च केला जाणार आहे,

(४) असल्यास, सदर अभियानाबाबत शासनामार्फत कोणती यंत्रणा राबविण्यात येणार आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

दि.२६ जानेवारी, २०१५ पासून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत ११ तालुक्यातील २८० गावांमध्ये अंमलबजावणी सुरु आहे.

(२) दिनांक २ जानेवारी, २०१५ च्या पत्रान्वये गाव निवड निकषानुसार २८० गावांची निवड करण्यात आली आहे.

(३) शासनाच्या निरनिराळया विभागामार्फत सन २०१५-१६ पर्यंत रु. ४२३ कोटी खर्च केले जाणार आहेत.

(४) जलयुक्त शिवार अभियान ही विविध विभागाच्या जलसंधारणाशी संबंधित योजनांचे अभिसन करुन राबविण्यात येत असून या योजनांना विशेष निधीतून मदत करण्यात येत आहे.

जिल्हास्तरावर पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आढावा व संनियंत्रण समिती, जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती व तालुकास्तरावर उप विभागीय अधिकारी (प्रांत) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती गठीत करण्यात आली आहे.

---

**कुरुळी (ता.खेड, जि.पुणे) येथील पाझार तलावाच्या जागेत**
**काही कंपन्यानी अतिक्रमण केल्याबाबत**

**(२) २४२३९ (१४-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुळी (ता.खेड, जि.पुणे) येथील पाझर तलावाला काही श्रीमंत व्यक्तींनी तसेच काही कंपन्यांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात जमिनीला अगदी पाच कोटी रुपयांपर्यंत एकराला भाव असल्याने तलावाच्या जागेत अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुरुळी गावाच्या हद्दीत लघु पाटबंधारे विभाग, पुणे यांच्या वतीने सन १९७८ मध्ये पाझर तलावाचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हे अतिक्रमण काढुन टाकण्यासाठी लघु पाटबंधारे विभागाचे वतीने कोणती कार्यवाही केलेली आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-१०-२०१७) :** (१) खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या दिनांक १५/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या अहवालानुसार मौजे कुरुळी, ता. खेड येथील पाझर तलाव व त्या सभोवती असलेल्या ग.नं.६०२, ६०४, ६०५, ६०७, ६०८, ६०९ व ६१० बाबत दुय्यम निबंधक, खेड यांच्या मुल्यांकन दाखल्यानुसार सन २०१७ या वर्षातील प्रति चौ.मी.चा दर रु. २,९२०/- रुपये होत असून हेक्टरी मुल्य रु. २,९२,००,०००/- असल्याचे दिसून येते.

(३) होय.

(४) सदर अतिक्रमण हटविणेसाठी संबंधीत कंपनीला दि.०३/१०/२००८ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. सदर तलाव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या घोषित क्षेत्रात येत असल्याने जिल्हा नियोजन समितीत सदर पाझर तलाव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत दिनांक २९/११/२०१० रोजी चर्चा झाल्याने अतिक्रमित क्षेत्राची संयुक्त मोजणी करुन रेडी रेकनरनुसार संपादीत जमिनीची किंमत निश्चत शक्य आहे. संयुक्त मोजणीसाठी तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांना दि.३/१०/२००८, दि.३१/१०/२००८ व दि.२०/११/२००९ व दि.१२/१०/२०१० च्या पत्रान्वये सुचना दिल्या आहेत.

---

**जलयुक्त शिवार अभियानाची जिल्हा परिषदांनी दखल घेतली नसल्याबाबत**

**(३) ४९७६० (२९-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुष्काळमुक्तीसाठी जलयुक्त शिवार अभियान सुरु केले असून जास्तीत जास्त निधी खर्च करुन कामे करण्याचे प्रशासनासह पालकमंत्री प्रमुख नेत्यांनी सातत्याने आवाहन केले असून जिल्हा परिषदेने मात्र गांभीर्याने घेतले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेची किती कामे केली याची माहितीच अधिकाऱ्यांना नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे सुरु होण्याबाबत शासनाने पुढे काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान अपयशी झाल्याबाबत**

**(४) ५३५८० (२४-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यात जलयुक्त अभियान टंचाई दूर करण्यास अपयशी ठरले असून अशीच फुटकळ कामे केली तर, संपूर्ण अभियान फसून सन २०१९ ला तालुका टंचाईमुक्त होणे अशक्य असल्याचे पत्र जलहक्क संघर्ष समितीच्या संयोजकाने मा.मुख्यमंत्री यांना तक्रारीची दखल घेण्याबाबत व येवला तालुक्यातील जलयुक्त अभियानातंर्गत झालेल्या कामाची उपयुक्तते संबंधी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी नाशिक यांना ग्रामविकास विभागाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय
(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत येवला तालुक्यात सन २०१५-१६ मध्ये विविध यंत्रणेमार्फत ६५७ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. साठवण तलाव ममदापूर या योजनेच्या तांत्रिक मान्यता व जमिन संपादन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. नियोजित साठवण तलाव राजापूर (वडपाटी) व नियोजित साठवण तलाव जायदरे (आडनदी) या योजनेच्या पाणी वापरास ना हरकत दाखला प्राप्त झाला असून पाणी उपलब्धतता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत राज्य शासनाचे स्वतंत्र अनुदान उपलब्ध आहे. तसेच ठिबक सिंचन योजना अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येते.

---

**जलयुक्त शिवार योजनेची कामे धीम्या गतीने होत असल्याबाबत**

**(५) ५४१४६ (२४-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार अभियानाचा पहिलाच टप्पा रेंगाळत असल्याचे तर दुसरा टप्प्यात कामे धीम्या गतीने होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबरोबरच शेततळ्यांसाठी शेतकऱ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या किरकोळ रकमेमुळे तळ्यांच्या कामे बंद पडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियानात अधिकारीच अनभिज्ञ असून अनेक तालुक्यात कामांना सुरुवात देखील झालेली नाही तर अनेक तालुक्यात कामे धीम्या गतीने होत आहेत, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्व साधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील एडगाव, इनामदारवाडी जवळून वाहणाऱ्या सुखनदीतील गाळ काढण्याबाबत**

**(६) ५४५७९ (२४-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील एडगाव, इनामदारवाडी जवळून वाहणाऱ्या सुखनदीच्या महापूरापासून इनामदारवाडीला पावसाळयात मोठा धक्का दरवर्षी बसत असल्याने सदरहू सुखनदीतील संपूर्ण गाळ काढण्यात यावा अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी मागील २ वर्षापासून सातत्याने मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.जलसंपदामंत्री, मा.पर्यावरणमंत्री, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा आदीकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सुखनदीतील गाळामुळे दरवर्षी पावसाळयात एडगाव मधील इनामदार वाडीस महापूराचा धोका निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीनुसार सुखनदीतील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-१०-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

माहे जून, २०१५ अखेर यांत्रिकी विभागामार्फत सुखनदीतील गाळ काढण्यात आला होता. त्यानंतरच्या पावसाळयामध्ये सदर ठिकाणी महापुराचा धोका निर्माण झाला नाही. तथापि सदरचा गाळ पुन्हा नदीपात्रात आल्याने जुलै २०१६ मध्ये पुरपरिस्थिती निर्माण झाली होती.
(३) मौजे एडगाव इनामदारवाडी येथे सुखनदीतील गाळ काढणेसाठी जिल्हा नियोजन समितीकडून विभागीय कार्यालयास प्राप्त झालेल्या रु. ४३.६१ लक्ष निधीमधून यांत्रिकी विभाग अलोरे यांचेकडून येथील सुखनदीतील गाळ काढण्यात आला आहे.

सदर काम समाधानकारक झाले असून या कामामुळे पुराचा धोका उद्भवणार नसलेचे पत्र एडगाव इनामदारवाडी ग्रामपंचायतीने दिले आहे.

तथापि सदरचा गाळ पुन्हा नदीपात्रात आल्याने जुलै २०१६ मधे पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर संरक्षक भिंतीचे अंदाजपत्रकावर जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलयुक्त शिवार योजनेतील नदी खोलीकरणाचे निकष

**(७) ५८२७२ (२४-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार या योजनेअंतर्गत अस्तित्वातील सिमेंट नाला बांधातील गाळ काढणे व खोलीकरण करणे या संदर्भाच्या दिनांक ९ मे, २०१३ व ५ डिसेंबर, २०१४ च्या शासकीय परिपत्रकात नाला खोलीकरण फक्त दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाच्या जलप्रवाहांवरच (2nd and 3rd order Streams) घेण्यात यावे असे नमूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलयुक्त शिवार या योजनेमध्ये नदी खोलीकरण करताना हे निकष पाळले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलयुक्त शिवार या योजनेमध्ये खोलीकरण करण्यात आलेल्या जलप्रवाहांची संख्या आणि त्यांचे वर्गीकरण याची जिल्हावार माहिती काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये शासकिय व लोकसहभागातून गाळ काढणे / खोलीकरण / रूंदीकरणाची एकूण १७५७९ कामे हाती घेण्यात आली होती त्यामधून ३०३३.५० कि.मी. लांबीची कामे पूर्ण झाली आहेत.

---

**राज्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत होणाऱ्या कामांचा दर्जा सुधारण्यासाठी कृषी अभियांत्रिकीची श्रेणी निर्माण करणेबाबत.**

**(८) ५९२३० (२४-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दुष्काळ निवारण व जलसंधारण करण्याच्या हेतूने सन २०१५-१६ पासून जलयुक्त शिवार अभियान योजना सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सन २०१५-१६ व २०१६-१७ या योजनेच्या माध्यमातून शेकडो कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देवून अनेक कामे पूर्ण केलेली आहेत व अनेक कामे प्रगती पथावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या योजनेतील ६०% कामे कृषी विभागाकडून माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, लूज बोल्डर, मजगे इ. कामे करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास कृषी विभागाकडे वरील कामांचे अंदाजपत्रक व संकल्पचित्र तयार करण्याकरिता तांत्रिक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे सदर अंदाजपत्रक व संकल्पचित्र प्रत्यक्षात पाहणी खाजगी यंत्रणेमार्फत केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यामुळे सदर कामांचा दर्जा निकृष्ट असल्याचे तालुका सनियंत्रण समित्यांना निदर्शनास आले आहे काय,
(६) असल्यास, कामांचा दर्जा सुधारण्यासाठी शासन कृषी अभियांत्रिकीची श्रेणी निर्माण करण्याचा निर्णय घेणार आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कंक्राडी (जि.पालघर) बंधाऱ्याची जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत दुरुस्ती करण्याबाबत

**(९) ६०३६८ (२४-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंक्राडी (जि.पालघर) खाडीवरील बंधाऱ्यांची राज्य सरकारने केंद्र सरकारच्या अनुमतीने जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत दुरुस्ती केल्यास भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल याबाबत दिनांक ४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासन जल अभियंत्यामार्फत पाहणी करुन जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत दुरुस्तीस परवानगी देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, शासन कोणती उपाययोजना आखणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा मंजूर निधी वितरीत होण्यास विलंब लागत असल्याबाबत

**(१०) ६४१३८ (११-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये सामाजिक क्षेत्रासाठी अपुरी तरतुद करण्यात आली असून राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मंजूर निधी प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी वर्षभरासाठी असलेला निधी हा शेवटच्या २-३ महिन्यामध्ये प्राप्त होतो आणि तो खर्च तातडीने करावा लागत असल्याने त्याचा दर्जा राखणे अधिकाऱ्यांना अत्यंत अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा मंजूर निधी त्वरीत वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सन २०१६-१७ मध्ये सामाजिक क्षेत्रासाठी आवश्यक ती तरतुद अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात केलेली आहे. तसेच मंजूर निधी विलंबाने प्राप्त होत नसुन विहीत मुदतीत प्राप्त झालेला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात महिलांसाठी विशेष कक्ष उपलब्ध करुन देणेबाबत**

**(११) ६४७७८ (२४-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष कक्षाची सोय उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांना कर्मचाऱ्यांना तात्काळ विशेष कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१०-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) मंत्रालयीन स्तरावर तसेच प्रशासकीय विभागाच्या अंतर्गत असलेल्या विविध क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयातील अस्तित्वातील जागेमध्येच महिला कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेऊन, जागेच्या उपलब्धतेनुसार विशेष कक्षाची व्यवस्था संबंधीत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग / स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मदतीने करावयाची आहे. त्यानुसार सर्व शासकीय विभागांना सूचना देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गतचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(१२) ६५५५९ (१६-१२-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीसाठी विदर्भात राबविण्यात आलेल्या सूक्ष्म सिंचनांचे सुमारे १ लाख २७ हजार ५५० शेतकऱ्यांचे २५३ कोटी ४६ लाख ३१ हजार रुपयांचे अनुदान प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्यांना तातडीने अनुदानाचे वाटप करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) आरोग्य तपासणीत पहिली ते बारावीपर्यत शिक्षण घेणाऱ्या विद्‌यार्थ्यांमध्ये कर्णदोष, डोळयांचे विकार, त्वचारोग, रक्तक्षय आजार असल्याबाबत**

**(१३) ६६४३७ (०९-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) आरोग्य तपासणीत पहिली ते बारावीपर्यत शिक्षण घेणाऱ्या काही विद्‌याथ्यामध्ये कर्णदोष, डोळयांचे विकार, त्वचारोग, रक्ताक्षय आजार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे आजार पाणी व हवा प्रदूषणामुळे होत असल्याचेही निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्‌यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीअंती विद्‌यार्थ्यांना खालीलप्रमाणे आजार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत वा त्यादरम्यान आढळून आले आहे.

| | |
|---|---|
| कर्णदोष | ११ |
| डोळयांचे विकार | ७७ |
| त्वचारोग | ०९ |
| रक्ताक्षय | ३७ |

(२) हे खरे नाही.

सदरचे आजार हे वैद्‌यकीय व इतर कारणांमुळे होतात.

(३) ११ कर्णदोष असलेल्या विद्‌यार्थ्यापैकी ९ विद्‌यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयात औषधोपचार केला व उर्वरीत २ विद्‌यार्थ्यांना पुढील तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात ई.एन.टी तज्ञांचा सल्ला घेण्यासाठी पाठविण्यात आलेले होते व सदर २ विद्‌यार्थी औषधोपचारानंतर बरे झालेले आहेत.

डोळयांच्या विकारामध्ये ७७ विद्‌यार्थ्यापैकी २५ विद्‌यार्थ्यांना जिल्हा रुग्णालयात डोळयांची तपासणी करुन चष्मे देण्यात आले. ४९ विद्‌यार्थ्यांना डोळे येणे, डोळयातून पाणी येणे या कारणांसाठी ग्रामीण रुग्णालयात औषधोपचारानंतर बरे झालेले आहेत. उर्वरीत डोळयांच्या विकाराचे ३ लाभार्थी (2 squint आणि Retino-Blastoma) हे पुढील शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेले असून त्यांची शस्त्रक्रिया खाजगी रुग्णालयांमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आलेली असून सद्‌य:स्थितीत तीनही लाभार्थी बरे आहेत.

त्वचा रोग असणा-या ९ विद्‌यार्थ्यावर ग्रामीण रुग्णालयांमध्ये Antifungal, Skin Treatment हे उपचार देण्यात आले असून त्यांची तब्येत बरी आहे.

रक्तक्षय कमी असणा-या विद्‌यार्थ्यांना FS Tablets, Multivitamin tablets, Albendazole इत्यादी द्‌वारे प्राथमिक उपचार करण्यात आलेले असून सर्व विद्‌यार्थी बरे आहेत.

**अतिसारामुळे बालमृत्यूचे प्रमाण राज्यात ६ टक्के असल्याबाबत**

**(१४) ६६४६२ (१०-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिसारामुळे बालमृत्यूचे प्रमाण राज्यात ६ टक्के असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्य कुटुंब कल्याण विभागाच्या अहवालावरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत,

(३) अद्यापपर्यंत कोणत्या उपाययोजना केल्या नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये अतिसारावर उपयोगी पडणारी औषधे तसेच उपचारासाठी आवश्यक असलेल्या उपचार पध्दतीचे प्रोटोकॉल उपलब्ध आहेत.

राज्यात बालकांमधील अतिसार कमी करण्यासाठी "अतिसार नियंत्रण पंधरवडा" राबविला जातो.

आय. वाय. सी. एफ. अंतर्गत "मा" कार्यक्रमामध्ये सर्व बालकांना जन्म झाल्यापासून एक तासाच्या आत स्तनपान सुरु करणे, सहा महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान देणे यावर भर दिला जातो.

सर्व आरोग्य संस्थामध्ये स्वच्छतेचे संदेश व पिण्याच्या पाण्याचे निजंतुकीकरण बाबतचे प्रसिध्दी साहित्य लावण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी बालकांच्या तपासणीबाबत**

**(१५) ६६९९८ (१०-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एक लाख तीन हजार अंगणवाड्यातील ७३ लाख ६३ हजार बालकांपैकी २९ लाख १० हजार बालकांचीच म्हणजे ४० टक्के बालकांचीच तपासणी पूर्ण झाली असून उर्वरित ४४ लाख ५३ हजार बालकांची तपासणी अद्याप बाकी असल्याची बाब सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तपासणीचे काम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत व सदरचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल व त्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्यातील एकूण एक लाख तीन हजार एकशे अठ्ठावन्न अंगणवाड्यातील ७३ लाख ५२ हजार बालकांपैकी ६५ लाख २३ हजार ५९० म्हणजेच ८९ % बालकांची तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे.उर्वरित बालकांची तपासणी मार्च २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन केलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्याच्या आरोग्य विभागात अल्पशा मानधनावर काम करणारे कर्मचारी व अधिकारी यांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(१६) ६७९०० (१०-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्याच्या आरोग्य विभागात गेल्या ८ ते १० वर्षापासून अल्पशा मानधनावर काम करणारे कर्मचारी व अधिकारी यांना सेवेत कायम करण्याची मागणी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी यांनी उपजिल्हाधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन देऊन केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या पूर्ततेसाठी संपूर्ण जिल्ह्यातील सुमारे ४५० कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन येथील उपरोक्त अधिकारी व कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी मनुष्यबळास कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्याबाबत केंद्र शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्ह्यातील हावरगा व वझरगा (ता.देगलूर) येथील कोल्हापूरी बंधारा व इब्राहिमपुर (ता.देगलुर) येथील लघु पाटबंधारे तलावांना मंजुरी देण्याबाबत

**(१७) ७०४२१ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील हावरगा व वझरगा (ता.देगलूर) येथील कोल्हापूरी बंधारा व इब्राहिमपुर (ता.देगलुर) येथील लघु पाटबंधारे तलावांना मंजुरी देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन योजनांच्या कामांना मंजुरी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) उक्त प्रकरणी अद्यापी मंजुरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-१०-२०१७) :** (१) लोकप्रतीनिधीकडून अशी मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील हावरगा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम सन २०१० मध्ये, वझरगा येथील कोल्हापूरी बंधा-याचे काम सन १९९३ मध्ये व इब्राहीमपुर लघु पाटबंधारे तलावाचे काम २००४ मध्ये पुर्ण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाला जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेला निधी जलयुक्तमध्ये वर्ग न झाल्याबाबत

**(१८) ७०७८९ (०६-०१-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाला जिल्हा नियोजन समितीकडून सुमारे ३३ कोटीचा निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निधी अद्यापही जलयुक्तमध्ये वर्ग झालेला नसल्याने जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे पूर्व आणि पश्चिम विभागाची कामे मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी जलयुक्तमध्ये वर्ग न होण्याची कारणे काय आहेत व सदर निधी तातडीने वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा नियोजन समितीने रू.४२.०४ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माहीम इंडस्ट्रीयल इस्टेट (मुंबई) शिक्षण संस्थेकडून विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(१९) ७१५२९ (१६-१२-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम इंडस्ट्रीयल इस्टेट (मुंबई) येथील महाराष्ट्र पेरामेडीकल संस्थेत बहिर्गत शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांकडून वर्षाला ६० हजार रुपये फी घेवून प्रवेश दिला जातो व ही संस्था जयपूरच्या एन आय एम एस शी संबंधित असतानाही शुल्काची पावती महाविद्यालयामार्फत दिली जात असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी जिल्हाधिका-यांकडे केल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी स्वखर्चाने जयपूरला जाण्यास सांगण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०९-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

विद्यापीठाने परीक्षेसाठी जयपूर हे केंद्र ठेवले होते.

(३) प्रस्तुत विषयी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशी अहवालानुसार संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची फसवणूक झालेली दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक जिल्हयात भरती केलेल्या कंत्राटी डेटा ऑपरेटर व लेखापाल यांचे पगार कमी केल्याबाबत**

**(२०) ७१७५१ (०१-०१-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत, राज्यातील प्रत्येक जिल्हयांत कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर तथा लेखपाल हे पद सन २०११ साली भरले आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधनात वाढत्या महागाई भत्यात वाढ करण्याऐवजी त्यांचे पगार १२ हजार रुपयांवरुन फक्त ९ हजार करण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांत भरण्यात आलेले पद हे डाटा ऑपरेटर व लेखापाल असे दोन्ही असुन, दोन पदे एकत्र करुन या कर्मचाऱ्यांकडून अतिरिक्त कामे करुन घेतली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-१०-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ च्या केंद्र शासनाकडून प्राप्त कृती आराखड्या नुसार राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत कंत्राटी डाटा एन्टी ऑपरेटर तथा लेखापाल यांना एकत्रित मानधन रु.८८००/- करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर पदास पुर्वी प्रमाणेच मानधन मिळावे यासाठी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आशा वर्कर शाळांमध्ये मध्यान्ह भोजन बनविणारे कर्मचारी व गट्प्रवर्तक कर्मचारी यांना मानधन देण्याबाबत**

**(२१) ७१९२२ (०५-०१-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात आरोग्याच्या व शिक्षणाच्या सेवा देणाऱ्या आशा वर्कर शाळांमध्ये मध्यान्ह भोजन बनविणारे कर्मचारी व गट्प्रवर्तक कर्मचारी यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे मानधन दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी ग्रामीण भागात आरोग्याच्या सेवा देणाऱ्या आशा वर्कर निवडणुकीत निवडून आल्यास त्यांच्याकडून एका पदाचा राजीनामा घेतला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात आशा स्वयंसेविका योजनेची अमंलबजावणी सुरु असून केंद्र शासनाने प्रकल्प अमंलबजावणी आराखड्यात आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना कामावर आधारीत मोबदला मंजूर केलेला असल्यामुळे केंद्र शासनाच्या मंजूरीनुसार आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथे एन.आर.एच.एम च्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(२२) ७२५२४ (१६-०१-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथे एन.आर.एच.एम च्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तसेच राज्यात धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी तब्बल १५ वर्षापासून कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समावेश करण्याबाबत व सेवेत समावेश करेपर्यंत समान वेतन समान काम देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागणीसाठी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी मुंबईत मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी मनुष्यबळास कायमस्वरुपी शासन सेवेस सामावून घेण्याबाबत केंद्र शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत**

**(२३) ७३३९३ (११-०१-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक वस्तीवर सक्षम आरोग्य सेवा मिळावी याकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियांनातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची मुदत माहे मार्च, २०१७ मध्ये संपत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील ३० हजार तर राज्यातील ७१ हजार कर्मचारी बेरोजगार योजना होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.
ज्याअर्थी केंद्र शासनाने सन २०१७-१८ चा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सादर करणेबाबत कळविले आहे त्याअर्थी सदरचा प्रकल्प मार्च, २०१७ मध्ये संपणार नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत.**

**(२४) ७५८१९ (१९-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करुन त्यांना सेवासमाप्ती लाभ योजनेचा फायदा सेवेच्या प्रमाणात द्यावा आणि विविध मागण्यांसाठी राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या वतीने हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे मोर्चाचे आयोजन करुन शासनास त्यांच्या मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०९-२०१७) :** (१) होय.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाकडून सेविकांना लागू केलेले सर्व लाभ देण्यात येत आहेत. सेविकांच्या राज्य मानधनात वाढ करण्याचे तसेच सेवासमाप्ती नंतर विमा योजनेतंर्गत देण्यात येणाऱ्या एकरकमी लाभ योजनेत बदल करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे येळवी (ता.जत, जि.सांगली) गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गतचे अनुदान सिमेंट बंधारा न बांधताच अनुदान खर्ची केल्याबाबत**

**(२५) ७५८३२ (१९-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येळवी (ता.जत, जि.सांगली) गावामध्ये जलयुक्त शिवार योजने अंतर्गत कृषी विभागाने सिमेंट बंधारा न बांधताच ७ लाख रुपयाचे अनुदान खर्ची केल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम दिनांक १९ ऑक्टोंबर ते १५ डिसेंबर, २०१६ या कालावधीत पूर्ण झाल्याचे मापन पुस्तिका करा. ३२८० मधील पान क्र. १ ते ७ वर नोंदीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.

उपविभागीय कृषि अधिकारी, जत याचंमार्फत प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानूसार सदर कामात कोणताही भ्रष्टाचार आढळून आलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेने दुष्काळग्रस्त गावांमध्ये कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांसाठी निधीची तरतूद करणेबाबत.**

**(२६) ७५९३० (१५-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेने दुष्काळग्रस्त गावांमध्ये कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी जलसंधारणाची कामे हाती घेतली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांतर्गत १३ तालुक्यांमध्ये ६५ कोटी ४७ लाखांची ३४२ कामे करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पुणे जिल्हयात छोटे पाटबंधारे विभाग जि.प.पुणे विभागाद्वारे जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मध्ये निवडलेल्या २०० गावांमध्ये ३३२ कामांचा रु. ३६.७६ कोटीचा रक्कमेचा आराखडा तयार करण्यात आलेला होता व त्यापैकी दिनांक ३१ जुलै, २०१७ अखेर ३३० कामे पूर्ण व २ कामे प्रगतीत आहेत त्यावर रु. ३४.३७ कोटी निधी खर्च करण्यात आलेला आहे.

तसेच सन २०१६-१७ मध्ये छोटे पाटबंधारे विभाग जि.प.पुणे विभागाद्वारे निवडलेल्या १९० गावांमध्ये ४८० कामांचा रु. ७७.६६ कोटी रक्कमेचा आराखडा तयार करण्यात आला होता व त्यापैकी ३१ जुलै, २०१७ अखेर ४२ कामे पूर्ण व ७४ प्रगतीत आहेत त्यावर रु. ५.६४ कोटी खर्च करण्यात आलेला आहे. सदर कामांसाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन समिती (विशेष निधी) व जि.प.निधी तसेच जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२ २६८१ मार्फत उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयासह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयावर (जि.कोल्हापूर) ताण पडत असल्याबाबत**

**(२७) ७६६८४ (१५-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयासह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयावर (जि.कोल्हापूर) मोठा ताण पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयात अपुऱ्या सुवेधेमुळे रुग्णालयाची दयनीय अवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार या रुग्णालयात तात्काळ सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

**श्री. गिरीष महाजन (०९-१०-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर या रुग्णालयात रुग्णांना आवश्यक सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येतात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील मंचर व घोडेगांव ग्रामीण रुग्णालयांतील औषधांच्या तुटवडयाबाबत**

**(२८) ७६८९७ (१८-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील मंचर व घोडेगांव ग्रामीण रुग्णालयांमध्ये शासनाकडून गेल्या २ वर्षापासून औषध पुरवठा होत नसल्याने रुग्णांना बाहेरुन औषधे विकत आणावी लागत आहेत व यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंचर व घोडेगांव ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकांनी सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच जिल्हा आरोग्य प्रशासनाला वारंवार लेखी कळवूनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांलयांना औषधे पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) स्थानिक स्तरावर औषधे व साहित्यसामग्री उपलब्ध करुन देण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, मंचर व ग्रामीण रुग्णालय, घोडेगांव यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अनुदान वितरीत करण्यात आले होते. त्यानुसार उपजिल्हा रुग्णालय, मंचर व ग्रामीण रुग्णालय, घोडेगांव येथे स्थानिक स्तरावर औषधे खरेदी करण्यात आली आहेत.

सदर रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक औषधींचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून जी औषधे औषधी भांडारात उपलब्ध नाहीत, अशी औषधे स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या अनुदानातून खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन दिली जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील ज्ञानगंगा, विश्वगंगा, केदार व कमळजा नदयांच्या बंधाऱ्यांची झालेली दुरवस्था

**(२९) ७७११२ (१७-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील ज्ञानगंगा, विश्वगंगा, केदार व कमळजा या प्रमुख नदयांवर वेगवेगळे बंधारे बांधण्यात आले असून सदरहू बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, नांदुरा तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत नऊ तर सन २०१५-१६ मध्ये १८ गावांची निवड करण्यात आली असून या सर्व बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नसल्यामुळे बंधाऱ्यांतील पाणी वाहून गेल्याने शेतकऱ्यांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नारखेड गाव जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये समाविष्ट असून त्यानुषंगाने बंधारा दुरूस्तीच्या कामाची ई निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच टाकरखेड गावाचा जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ मध्ये समावेश असून सदरील बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शासकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे औषध मिळत नसल्याबाबत

**(३०) ७७९७५ (१८-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील क्षयरोगाच्या विभागात रुग्णांना नियमित औषध मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी या विभागाचे औषध वितरण केंद्र नसून आरोग्य विभाग सेवा देत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-१०-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि, एप्रिल, २०१७ पासून रुग्णांना नियमितपणे औषधे पुरवठा करण्यात येत आहे.

(२) क्षयरोग विभागात क्षयरोग रुग्णांकरिता क्षयरोगावरील औषधीचा पुरवठा सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात येतो.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे एप्रिल, २०१७ पासून नियमित औषधे पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये रूग्णांच्या नातेवाईकांकरीता प्रतिक्षालय व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध नसल्याबाबत

**(३१) ७८५६५ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये रूग्णांच्या नातेवाईकांकरीता प्रतिक्षालय व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध नसल्याबाबतची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अद्ययावत ट्रामा केअर सेंटरमध्ये अपघातात गंभीर जखमी झालेल्या रूग्णांची संख्या वाढली असुन त्यासोबतच येणा-या नातेवाईकांच्या संख्येत सुध्दा वाढ झाल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ट्रामा केअर सेंटरमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेली रूग्णांची संख्या लक्षात घेता त्यांच्या नातेवाईकांकरीता अद्यापपर्यंत प्रतिक्षालय व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ट्रामा केअर सेंटरमध्ये रूग्णांच्या नातेवाईकांची होणारी गैरसोय टाळण्याकरीता त्यांच्याकरीता प्रतिक्षालय व स्वच्छतागृहाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-१०-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर च्या परिसरात प्रतिक्षालय व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध असल्याने व ट्रॉमा केअर सेंटर हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर च्या परिसरातच आहे तसेच ट्रॉमा केअर सेंटरच्या जवळच ३ धर्मशाळा उपलब्ध असून या धर्मशाळांमध्ये ट्रॉमा केअर सेंटर मध्ये येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याकरीता प्रथम प्राधान्य देण्यात येत असल्याने तेथील रुग्णांच्या नातेवाईकांकरिता स्वतंत्र सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांची चौकशी करणेबाबत**

**(३२) ७८६४४ (१७-०४-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात पर्जन्यवृष्टीमुळे नुकसान झालेल्या निकृष्ट दर्जाच्या जलसंधारण कामाची तातडीने चौकशी करण्यात येऊन संबंधित ठेकेदारांमार्फत सदरच्या कामाची दुरुस्ती करून घेणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक ७ सप्टेबर २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) मा.लोकप्रतिनिधींनी दि.१९/८/२०१६ रोजी मा.मंत्री (जलसंधारण) यांचेकडे सिन्नर विधानसभा मतदार संघात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जलसंधारणाच्या कामाच्या दुरूस्तीबाबत मागणी केलेली आहे.
(२) दुरूस्ती प्रस्तावित करण्यात आलेल्या बंधाऱ्यांपैकी मौजे कुंदेवाडी, मौजे पास्ते व मौजे सावतामाळी नगर या ०३ बंधाऱ्यांचे दुरूस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मौजे पाटपिंप्री व मौजे सुळेवाडी या बंधाऱ्याची दुरूस्ती करणेबाबत संबंधित ठेकेदारास सुचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावनेर, कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील जल शिवार योजनेतील कामाकरिता निधी मिळण्याबाबत**

**(३३) ७९४२७ (१७-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील १८० कामे जलशिवार योजनेतंर्गत सुरू करण्यात आले असून त्यातील ३७५ कामे प्रस्तावित करण्यात आली असून या कामाकरिता जवळपास २४ कोटी रुपयाच्या निधीची आवश्यकता असल्याचा प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी, सावनेर यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नागपूर यांच्याकडे पाठविला असतांनाही अद्यापही सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याची माहिती दिनांक ३१ जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावनेर व कळमेश्वर तालूक्यात जलशिवार योजनेतंर्गत सुरू असलेले सर्व कामे निधीअभावी बंद पडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामाकरिता २४ कोटी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गतच्या निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३४) ८१६८९ (१८-०४-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कोटयवधी रुपयांचा आराखडा तयार करुन १६ गावांमध्ये अदयापपर्यंत कामे सुरु न झाल्याने एक ते सव्वा कोटी रुपये अखर्चित राहील्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
कळमनुरी तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये दि.२२/९/२०१७ अखेर जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिलेल्या ५६२ कामांपैकी ३०३ कामे पूर्ण करण्यात आली असून १६६ कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तुत कामांवर आतापर्यंत रू.५११.२६ लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गुडी, वाटोद व एकलारा (ता.मानोरा, जि.वाशिम) आदी गावांच्या शेत शिवारात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मागील वर्षी सुरु करण्यात आलेली कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३५) *८१९०५* (१८-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुडी, वाटोद व एकलारा (ता.मानोरा, जि.वाशिम) आदी गावांच्या शेत शिवारात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मागील वर्षी सुरु करण्यात आलेली कामे अपूर्णावस्थेत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार जलयुक्त शिवाराची कामे अपूर्णावस्थेत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी काम करण्यास दिरंगाई करणा-या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांर्गत मौजे गुडी, वाटोद व एकलारा या गावांत कृषि विभागामार्फत २ कामे, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ३६ व जलसंधारण विभाग ६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदरील गावात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मागील वर्षी हाती घेण्यात आलेली सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमोडी (ता.खेड, जि.पुणे) धरणातून आदिवासी गावांना उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी पुरवठा करणेबाबत**

**(३६) *८३९२७* (२०-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा नदीची उपनदी आरळा या नदीवरील कळमोडी धरणातून खेड (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी गावांना उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१२-१०-२०१७) :** (१) होय, कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग,पुणे यांचे अखत्यारीतील आरळा कळमोडी मध्यम प्रकल्पांतर्गत भीमाशंकर आदिवासी उपसा सिंचन योजना, ता.खेड, जि.पुणे ही योजना कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग,

पुणे यांचेकडे हस्तांतरीत करण्यात यावी अशा सूचना मा.राज्यमंत्री (जलसंपदा व जलसंधारण) यांचे दालनात दि.२३/९/२०१५ राजी झालेल्या बैठकीत देण्यात आल्या. त्याअनुषंगाने एकलहरे व कुडे या उपसा सिंचन योजना या जलसंधारण विभागाकडे हस्तांतरीत केल्या. सदर दोन्ही गावांसाठी दोन स्वंतत्र उपसा सिंचन योजनांचे प्रारुप प्रकल्प दिनांक २०/७/२०१६ रोजी शासनास सादर करण्यात आला.

(२) शासन पत्र दिनांक ३१/८/२०१६ अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, पुणे यांचेकडे सुरु आहे.

(३) जलसंपदा विभागाचा शासन निर्णय दि.२१/११/२००२ नुसार धरणाच्या जलाशयातुन प्रकल्पीय सिंचन क्षेत्राच्या ६ टक्के पर्यंत उपसा सिंचनासाठी असलेल्या मर्यादीत क्षेत्रातुन सदर प्रकल्प असल्याने त्याकरीता जलसंपदा विभागाकडुन करण्यात येणाऱ्या उपसा सिंचनाबरोबरच दोन्ही योजनांचे क्षेत्र त्यामध्ये समाविष्ट आहे किंवा कसे याबाबतचा खुलासा जलसंपदा विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

## मौजे केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथील बांधकाम व्यावसायिकांकडून वनसंपदा नष्ट करण्यात येत असल्याबाबत

**(३७) ८५१९५ (११-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथील गट नं. ५९ व ६० मध्ये बांधकाम व्यावसायिकाकडून मोठ्याप्रमाणात वनसंपदा नष्ट करण्यात येत असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच बांधकाम व्यावसायिकावर याच ठिकाणी पूर्वी ३० झाडे बेकायदा तोडल्याप्रकरणी वन विभागाकडून वन गुन्हा नोंदविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकामासाठी वनसंपदा नष्ट करण्यात येत असतांना शासनस्तरावर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०१७) :** (१), (२) व (३) मौजे-केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथील गट नं.५९ व ६० हे खाजगी मालकीचे असून, महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ अंतर्गत सदर गटातील वृक्षांची तोड करण्यास वन विभागाने परवानगी दिलेली नाही. तथापि, सदर क्षेत्राच्या चारही बाजूस वनक्षेत्र आहे. सदर क्षेत्रात जाण्यासाठी रस्ता, विद्युत लाईन व पाण्याची लाईन टाकणेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ०.६८ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणास केंद्र शासनाने दिनांक २३/०८/२००५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. सदर मान्यता दिलेल्या ३ मीटर रस्त्याऐवजी ६ मीटर रुंदीचा रस्ता करण्यासाठी अतिरिक्त ०.७२ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक ०२/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये

सादर करण्यात आला आहे. केंद्र शासनाने सदर प्रस्तावासंबंधी दिनांक २०/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता अद्याप प्रकल्प यंत्रणेने केलेली नाही.

मौजे-केसनंद, फॉरेस्ट गट क्र.१०३ मध्ये अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या बाजूस अनधिकृत मुरुम/ खोदाई केल्याचे निदर्शनास आल्यानंतर वन विभागाने संबंधित पोकलेन, जेसीबी मशीन, डंपर इ. जप्त करुन संबंधितांविरुद्ध वनगुन्हे नोंदविले आहेत. सदर प्रकरणी मा.जे.एफ.एम.सी., पुणे यांच्या न्यायालयात फौजदारी दावा क्र.१६७९३/२०१७, १६७९४/२०१७ व १६७९५/२०१७ असे एकूण तीन दावे दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील रक्तपेढयामध्ये रक्ताची टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(३८) ८७०३३ (१२-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील रक्तपेढयामध्ये रक्ताची टंचाई निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्ताच्या टंचाईमुळे रुग्णांच्या नातेवाईकांना इतरत्र रक्त पेढयातून आणण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

उन्हाळयात मे व जून महिन्यात रक्त संकलनाचे प्रमाण इतर महिन्यापेक्षा कमी होते. परंतु रक्ताची टंचाई निर्माण झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शासनाने चौकशी केली असता, पनवेल (जि.रायगड) येथे १) एम.जी.एम. रक्तपेढी, कामोठे, पनवेल २) श्रीसाई रक्तपेढी, पनवेल ३) डॉ.बी.व्ही.लिमये रक्तपेढी, पनवेल या धर्मादाय संस्था संचालित रक्तपेढयामध्ये मे, महिन्यात अनुक्रमे २२८ युनिट, ५२ युनिट व ११७ युनिट इतके रक्त संकलन झाले आहे.

(४) राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड-अलिबाग यांचेकडे रक्ताची टंचाई निर्माण झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तीन वर्षात ५० कोटी वृक्षरोपण व संगोपनाचा कार्यक्रम**
**लोकसहभागाद्वारे राबविण्याचा संकल्प**

**(३९) ८७६८८ (१८-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन व वन विभागाने पुढील तीन वर्षात ५० कोटी वृक्षरोपण व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे राबविण्याचा संकल्प केला असून त्यासाठी दिनांक ३१ मार्चपर्यंत हरित सेनेच्या एक कोटी सदस्य नोंदणीचे उद्दीष्ठ ठेवले होते, मात्र ते पूर्ण करण्यास वन विभाग अपयशी ठरल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत दिनांक १५ एप्रिलपर्यंत केवळ २२ लाख सदस्यांचीच नोंदणी झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संकेतस्थळावर नोंदणी करण्याची प्रक्रिया अडचणीची असल्याने नोंदणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतुबदल या पार्श्वभूमीवर राज्यातील वनक्षेत्र १९ टक्क्यांवरुन ३३ टक्क्यापर्यंत वाढविण्याकरीता वृक्षरोपण लागवडीस जास्तीत जास्त भर देण्याबाबत शासनाने आकृतिबंध आराखडा तयार केला आहे काय,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

हरितसेनेच्या संकेतस्थळावर सदस्य नोंदणी प्रक्रिया करताना बऱ्याच प्रमाणात अडचणी येत होत्या. परंतू सदर नोंदणी प्रक्रियेत वेळोवेळी सुधारणा करुन येणाऱ्या अडचणी दूर करुन सदस्य नोंदणी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. माहे ऑगस्ट २०१७ अखेर ३१,६७,३९० इतकी सदस्य नोंदणी झालेली आहे.

(४) होय.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यात पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून केलेली**
**कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(४०) ८९८९० (११-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात शासनाने सिंचनाची सोय उपलब्ध होण्याकरीता पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून वनराई बंधारे, सिमेंट बंधारे, शेततळी, इत्यादी कामे करण्यांत येत असून सदर कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराबाबत**

**(४१) ९०२८२ (२१-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी हे डयुटीवर असतांना देखील मद्यधुंद अवस्थेत काम करत असून पेशंटवर उपचार करण्यास नकार देण्याची घटना माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हा परीषद सदस्य हरिदास लोहकरे यांनी जिल्हा रुग्णालयातील प्रभारी वैद्यकिय अधिकारी व स्थानिक पो. स्टेशनला संबंधित वैद्यकिय अधिकारी पवार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) होय.
(४) चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी सदरची घटना ही केवळ गैरसमज झाल्याने तसेच वादावादीमुळे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करणे व त्यानंतर तक्रार मागे घेणे अशी प्रक्रिया घडल्याने संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने कर्तव्यात कसुर केल्याचे आढळून आले नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**किनवट (जि.नांदेड) सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने एक लाख वृक्ष लागवड करण्यासाठी ५० हजार पिशव्यामध्ये फक्त माती भरुन ठेवण्यात आल्याबाबत**

**(४२) ९११५२ (१८-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने जलधारा तांडा येथील शासकिय आश्रमशाळेच्या बाजूस नवीन रोपवाटिका तयार करण्यात आली आहे परंतु अधिकाऱ्यांच्या योग्य नियंत्रण नसल्याने एक लाख वृक्ष लागवड करण्यासाठी ५० हजार पिशव्यामध्ये फक्त माती भरुन ठेवण्यात आली असल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृगनक्षत्रात झाडे लावून ती झाडे जगवणे हे मुख्य उदिदष्ट सामाजिक वनीकरण विभागाचे असतांनाही फक्त माती भरुन ठेवण्यात आल्याने वनीकरण विभागाचा गैरकारभार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१७) :** (१) नाही.

सन २०१८ व २०१९ चे पावसाळयात वृक्ष लागवडीसाठी मौजे जलधारा तांडा, ता.किनवट, जि.नांदेड या रोपवाटीकेत १.५० लाख रोपे तयार करण्यात आली आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोकरदन व कळंब (जि.जालना) तालुक्यातील वृक्षलागवड योजनेबाबत**

**(४३) ९१५६८ (१८-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन व कळंब (जि.जालना) तालुक्यात गेल्यावर्षी शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी दोन कोटी वृक्षलागवड योजनेत सहभाग नोंदवला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील प्रमुख कार्यालयांनी लावलेल्या झाडांची देखभाल न केल्यामुळे ती झाडे वाळून गेल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू झाडांची देखभाल न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१७) :** (१) होय.

भोकरदन तालुक्यात दि. १.०७.२०१६ रोजी दोन कोटी वृक्ष लागवड योजनेत एकूण १५ शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी सहभाग नोंदविला होता.

(२) हे खरे नाही.

भोकरदन तालुक्यात २९४०७ रोपे लावलेली असून त्यापैकी माहे मे २०१७ अखेर ६९% रोपे जिवंत आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कांजोली, राणीगाव, मोथाखेडा (ता.धारणी, जि.अमरावती) गावातील कांगोली-बारुखेडा रस्ता वाहतुकीसाठी वनविभागाने मोकळा करून देण्याबाबत**

**(४४) ९१७३३ (१८-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांजोली, राणीगाव, मोथाखेडा (ता.धारणी, जि.अमरावती) गावातील कांगोली-बारुखेडा रोड हा रस्ता वाहतुकीसाठी वनविभागाने मोकळा करून द्यावा असे आदेश विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांनी दिनांक १७ मे, २०१७ रोजी उप वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोर वन्यजीव विभाग यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी आदेश देऊनही अद्यापपर्यंत रस्ता मोकळा करून देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत विभागीय आयुक्त यांना पत्र देवून सदर प्रकरणी आदेश देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक ५ मे, २०१७ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत व रस्ता ग्रामस्थांसाठी तातडीने मोकळा होण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) कांगोली ते बारुखेडा हा रस्ता वान अभयारण्यातून जात असून सदर रस्त्यावरील ५ गावांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. कांजोली, राणीगाव या गावाकरीता पर्यायी चांगला रस्ता उपलब्ध असल्याने कांगोली ते बारुखेडा हा रस्ता रहदारीसाठी मोकळा करणे योग्य ठरणार नसल्याचे मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचे मत आहे.

भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४(१) व २० अंतर्गत वनजमाबंदी अधिकारी यांनी ५ गावांचे पुनर्वसनानंतर कांगोली ते बारुखेडा रस्ता बंद करण्याचे आदेश दिले आहेत

(३) हे खरे आहे

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यात भूम-जामखेड रस्त्यावरील दुतर्फा लावण्यात आलेली झाडे नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(४५) ९१९४४ (१६-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यात भूम-जामखेड रस्त्यावरील मु.पो.सुकटा ते मु.पो.इराचीवाडी व मु.पो.बावी ते मु.पो.वरुड येथील दुतर्फा लावण्यात आलेली झाडे ही पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने १ जुलै २०१६ रोजी महाराष्ट्रामध्ये २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेतला होता त्यानुसार वृक्ष संवर्धनासाठी मोठया प्रमाणावर निधी देण्यात येतो, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही सर्व झाडे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.वने मंत्री यांचेकडे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने तातडीची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

दि.०१.०७.२०१६ रोजी मु.पो. सुकटा ते मु. पो. इराचीवाडी रोपवनात लावण्यात आलेल्या १००० रोपांपैकी ९८.७ % व मु.पों. बावी ते मु.पो. वरुड या रोपवनात लावण्यात आलेल्या १००० रोपांपैकी ९६.७ % रोपे जिवंत असून रोपांची चांगल्याप्रकारे संगोपन चालू आहे.

(२) नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे लोण प्र.भ.(पिराचे) (ता.भडगांव, जि. जळगांव) येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सिमेंट नाला बांध व साठवण बंधारा दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार**

**(४६) ९२१८९ (२३-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लोण प्र.भ. (पिराचे) (ता.भडगांव, जि.जळगांव) येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सिमेंट नाला बांध व साठवण बंधारा दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार ग्रामपंचायत कार्यालयानी मा.मुख्यमंत्री, यांच्यासह मा.जलसंधारण मंत्री व मा.पालकमंत्री यांच्याकडे दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.

प्रस्तुत कामांची ग्रीन होप फाउंडेशन, एरंडोल या त्रयस्थ संस्थेमार्फत पाहणी करण्यात आली असून अहवालानूसार कामात काहीही दोष आढळून आलेले नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयासाठी नदी पुर्नजीवन योजनेअंतर्गत**
**साडे पाच कोटी रुपयाचा निधी मिळणेबाबत**

**(४७) ९२४३० (२२-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयासाठी नदी पुर्नजीवन योजनेअंतर्गत साडे पाच कोटी रुपयाचा निधी देण्याचे आश्वासन मा.जलसंधारण मंत्री यांनी हिंगोली याठिकाणी दिले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामध्ये अंबाळा नदीवर एक कोटी खर्चून बांधले जातील व गोमदा नदीवर ९० लाख खर्चुन तीन सिमेंट नालाबांध केले जातील तसेच कयाधू नदीवर तीन कोटी खर्चुन सिमेंट नाला बांध केले जातील असेही आश्वासन मा.जलसंधारण मंत्री यांनी त्यावेळी दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याच आश्वासनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी तात्काळ नदी पुर्नजीवन योजनेअंतर्गत निधी मिळणेबाबत परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला असून त्या प्रस्तावाला अद्यापही मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) जलसंधारण विभाग दि.१०/८/२०१७ चे पत्रान्वये सेनगाव तालुक्यातील (जि.हिंगोली) कयाधू नदीस नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत ७ सिमेंट नाला बांधास रू.१५० लक्ष निधी वितरणास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील औंध जिल्हा रुग्णालयातील मेट्रो रक्तपेढीचे काम तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ९३५६७ (२१-०८-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील औंध जिल्हा रुग्णालयातील मेट्रो रक्तपेढीचे काम तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक १२ एप्रिल २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रक्तपेढीसाठी आवश्यक असणारी उपकरणे गेल्या दोन वर्षांपासून विनावापर राहिल्याने गरीब व गरजू रुग्णांना या सुविधेपासून वंचित राहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयी शासनस्तरावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०३-१०-२०१७) :**(१) हे अंशत: खरे नाही.

नियोजीत मेट्रो रक्तपेढीच्या ठिकाणी राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाची रक्तपेढी होती. त्याच रक्तपेढीचे नुतनीकरण करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले. परंतु सदर रक्तपेढीचे फॉल्ससिलिंग संपूर्णत: पडले. त्यामुळे प्रथमत: सदर मेट्रो ब्लड बँकेची छतगळती प्रतिबंधक उपाययोजना करुन घेण्यात आली. तद्नंतर फॉल्ससिलिंग व विद्युत कामे दुसऱ्यांदा करुन घेण्यात आली. सद्यस्थितीत सदर नियोजीत मेट्रो ब्लड बँकेची किरकोळ कामे बाकी असून ती कामे तातडीने पूर्ण करुन मिळणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. बांधकाम व विद्युत कामे पूर्ण झाल्यावर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे मेट्रो ब्लड बँकेस परवाना प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

सदर नियोजीत मेट्रो रक्तपेढीकरीता कोणतीही यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आलेली नाही. सामान्य रुग्णालय, सातारा यांचेकडून काही यंत्रसामुग्री सदर रक्तपेढीकरीता वर्ग करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत जिल्हा रुग्णालयाची रक्तपेढी कार्यान्वीत असल्यामुळे, गरीव व गरजू रुग्णांना रक्त मिळण्यापासून वंचित रहावे लागत नाही.

(३) मेट्रो ब्लड बँक कार्यान्वीत करण्यासाठी किरकोळ दुरुस्तीची कामे करुन घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

**गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाणा विद्यापीठाचा शैक्षणिक इमारतीचा प्रस्ताव वन विभागाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ९३७५८ (१८-०८-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाणा विद्यापीठाची स्थापना दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या बांधकामाकरिता ८८/१/९६/आणि १०० सर्वे न. मधील १५९.९८ हे.आर.वनजमीन मिळण्यासाठी विद्यापीठ द्वारा दिनांक १८/१२/२०१२ ला मुख्य वनसंरक्षक गडचिरोली यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रधान सचिव महसूल व वने यांचेकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वनजमीन उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-१०-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) गोंडवाणा विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या बांधकामासाठी सर्वप्रथम १५९.९८ हे. वनजमीन मागणीचा प्रस्ताव प्रकल्प यंत्रणेने राज्य शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतुदीनुसार व्यवहार्य नसल्याने त्यास केंद्र शासनास शिफारस न करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला होता. तद्नंतर प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मंत्री(वने) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४.०७.२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्देशानुसार वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत गोंडवाणा विद्यापीठाकरीता १९.९९ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव केंद्र शासनाने दि.०५.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये नामंजूर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर वन विभागातील ८५ वनमजुरांना अवैधरित्या कामावरुन कमी केल्याबाबत**

**(५०) ९४१५८ (१८-०८-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वन विभागातील सलग १० वर्षाची सेवा केलेल्या पात्र ८५ वनमजूरांना सन २००३-२००४ मध्ये अवैधरित्या कामावरुन कमी केल्यामुळे त्यांना परत शासन सेवेत पुन:स्थापना करण्याबाबत दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास राज्य माहिती आयोगाने शासनाला सुचित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ८.९.२०१६ चे आदेशात शासनास सुचित केले नसून कामावरुन कमी करण्यात आलेल्या मजुरांना मानवीय दृष्टीकोणातुन विचार करता नियमित करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र वनविकास महामंडळ लिमिटेड यांनी दिनांक २०.०८.२०१६ रोजी दिलेल्या निवेदनानुसार वनमजुरांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे निर्णयाची प्रतिक्षा करणे योग्य राहील. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे ८५ वनमजुरांना पुर्नस्थापीत करणेबाबत शासन स्तरावर सर्वकष विचार होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते व त्याप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करावी, असे मत राज्य माहिती आयोगाने व्यक्त केले आहे.
(२) राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांनी आदेशात निर्देशित केल्याप्रमाणे शासन स्तरावर सर्वकष विचार होणेसाठी विभागीय व्यवस्थापक वन प्रकल्प विभाग, नागपूर यांनी दिनांक ६.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये महाव्यवस्थापक, एफडीसीएम लि.मि. नागपूर प्रदेश नागपूर यांना कळविल्यानुसार वन प्रकल्प विभाग, नागपूर अंतर्गत राबविण्यात येत असलेले वानिकीचे कामे संपुष्टात आल्याने व काम उपलब्ध नसल्याने अतिरिक्त ठरत असलेल्या एकुण ८५ रोजंदारी कामगारांना सन २००३ व २००४ मध्ये त्यांना नुकसान भरपाईपोटी सेवा उपदानाची रक्कम अदा करुन न्यायोचित पध्दतीने कामावरुन कमी करण्यात आले आहे.

महसूल व वन विभागाचे शासन पत्र दिनांक ०७.०७.२०१५ नुसार ज्या मजुरांच्या सेवा त्यांना नुकसान भरपाई व सेवा उपदानाची रक्कम देऊन कमी केले असल्यास त्यांना पुन्हा शासन सेवेत पुन:स्थापित करता येत नाही. सदरच्या धारणेस विधी व न्याय व वित्त विभागाची सहमती आहे. त्याअनुषंगाने कमी करण्यात आलेल्या ८५ रोजंदारी कामगारांना दिनांक ०७.०७.२०१५ च्या शासन पत्रानुसार शासन सेवेत पुन:स्थापीत करता येत नसल्याने त्याना वन मजुर या अधिसंख्य पदावर कायम करण्यात आले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.